FORM-1A

N.C.R.B.
I.I.F.-I

# पहिली खबर

0154204

# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State **महाराष्ट्र**, जिल्हा District **मुंबई**, पोलीस ठाणे Police Station **का.प्र.वि.मुं.** पहिली खबर क्र. FIR No. **46**, वर्ष Year **2021**, दिनांक Date **13-11-21**

2. (i) अधिनियम Act **भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, 1988** कलमे Sections **7**
   (ii) अधिनियम Act **भा.द.वि.**, कलमे Sections **201**
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ..........

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day **बुधवार**, तारीख पासून Date from **10-11-21**, वेळ Time **11:00**, तारीख पर्यंत Date to **12-11-21**, वेळ Time **13:37**

   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).

   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 13.00 ते 06.00

   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date **10-11-2021**, वेळ Time **17:35**

   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोद क्र. General Diary Reference : Entry No. **9e**, तारीख Date **13-11-21** वेळ Time **13:15**

4. माहितीचा प्रकार Type of Information : **लेखी तक्रार अर्ज**, लेखी / तोंडी Written / Oral

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा .........., चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ..........
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name **कांदीवली पो.ठाणे चे आवारातील गुन्हे प्रकटीकरण शाखा, युनिट-11 चे बाजुस कांदीवली पश्चिम, मुंबई.** ठिकाणाचे नंबर No. if any .........., गल्ली Ward .........., रस्त्याचे नाव Name of road
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place .........., गाव Village .........., पोस्ट Post .........., तालुका Taluka .........., जिल्हा Dist. .........., राज्य State ..........
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station .........., तालुका Taluka .........., जिल्हा Dist. .........., राज्य State ..........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name **मोहनसिंग रुपसिंग कडेचा** (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name **रूपसिंग कडेचा**
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age **42 yrs** (d) राष्ट्रीयत्व Nationality **भारतीय** फोन नं. Phone No. **9869982304**
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. .........., दिल्याचा दिनांक Date of Issue .........., दिल्याचे ठिकाण Place of Issue .........., (f) व्यवसाय Occupation **ज्वेलर्स**
   (g) धर्म Religion **हिंदू**, जात Caste .........., जनजात Sub-Caste ..........
   (h) पत्ता Address : गल्ली / सर्व्हे नं. Ward घर / गाव नं. House/Name No. फोन / मो. नं. Phone/Mo. No. पॅन नं. PAN No. वोटर्स नं. Card No. **महालक्ष्मी ज्वेलर्स, पोयसर गावदेवी रोड, काजुपाडा, कांदीवली पुर्व, मुंबई-101**
   रस्त्याचे नाव Road .........., जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place .........., गाव Village .........., पोस्ट Post .........., पो. स्टे. P. Stn. ..........
   तालुका Taluka .........., जिल्हा Dist. .........., राज्य State .........., सध्याचा पत्ता Present Address ..........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

1) आरोपी रवींद्र रामहरी [redacted]ळे, वय-39 वर्षे, धंदा-नोकरी. (पो.ना.क्र.050157, नेमणूक-कांदीवली पो.ठाणे, मुंबई), रा-रु.6/35, 2nd floor, ताडदेव पोलीस लाईन, ताडदेव, मुं-33
2) आरोपी अविनाश तानाजी पवार, [redacted]37 वर्षे, धंदा-नोकरी (सहाय्यक पोलीस निरिक्षक) नेमणूक-कांदीवली पो.ठाणे मुंबई, रा.रु.T-5-[redacted] न्यु कालिना पोलीस लाईन, सांताक्रुझ पुर्व, मुं-55

Y.P.P.-800 Reg.-(25×6=150 Lvs.)-2-2018-PA3-(K) 829

फिर्यादी श्री मोहनसिंग रूपसिंग कडेचा वय ४२ वर्षे, व्यवसाय - ज्वेलर्स, रा. ही. महालक्ष्मी ज्वेलर्स, पोयसर गावदेवी रोड, काजूपाडा, कांदीवली पुर्व, मुंबई ४००१०१ यांचा संगणकीकृत नोंदविण्यात आलेला जबाब हिच गुन्ह्याची पहिली खबर म्हणून संबोधण्यात येत आहे.

समक्ष

मोहनसिंग कडेचा

(अविनाश पोवार)
सहाय्यक पोलीस आयुक्त,
ला. प्र. वि. मुंबई.

जबाब दि. १३/११/२०२१

श्री. मोहनसिंग रूपसिंग कडेचा, हि. ४२ वर्षे, धंदा– व्यवसाय ( ज्वेलर्स ), पत्ता – महालक्ष्मी ज्वेलर्स, पोईसर गावदेवी रोड, काजुपाडा, कांदिवली पुर्व, मुंबई ४०० १०१ मोबाईल क्र. ९८६९९८२३०४

---

माझे मुळ गांव धानीन, पोस्ट केलवा, जिल्हा–राजसमंद, तहसिल–कुमलगड, टाणा– चारभुजा, राज्य– राजस्थान आहे. मी वरीलप्रमाणे असून उपरोक्त नमुद पत्त्यावर गेल्या २० वर्षापासुन रहावयास आहे. माझे सोबत माझी पत्नी नामे श्रीमती कमला मोहनसिंग कडेचा, वय ३८ वर्षे, माझी मुंलगी नामे कुमारी सुरज मोहनसिंग कडेचा वय १६ वर्षे व दुसरी मुलगी कुमारी सेजल मोहनसिंग कडेचा, वय १४ वर्षे असे एकत्रित रहावयास आहे. माझा स्वत:चे काजुपाडा, कांदिवली पुर्व, मुंबई येथे महालक्ष्मी ज्वेलर्स, पोईसर गावदेवी रोड, काजुपाडा, कांदिवली पुर्व, मुंबई येथे दुकान असुन सदर दुकानात मी सोने घडविण्याची व विक्री करण्याचे काम करीत असुन त्यातुन माझा कुटूंबाचा उदरनिर्वाह चालतो.

दिनांक ०९/११/२०२१ रोजी माझे परिचयाचे श्री. दिनेश जैन यांचे मोबाईल क्र. ९०८२६४४८७६ फोनवरून माझे मोबाईलवर फोन आला व समोरून एका साहेबांनी मला तात्काळ ५ ते १० मिनीटात कांदिवली पोलीस स्टेशन येथे बोलाविले. त्यानंतर थोडया वेळाने माझे दुकानावर दिनेश जैन यांचा मुलगा आला व मला कांदिवली पोलीस स्टेशन येथे घेवुन गेला. तेथे पहिल्या माळयावर गुन्हे प्रकटीकरण कक्षात टेबलासमोर एक साहेब बसले होते व त्यांचे शेजारी एक जाडा व्यक्ती बसला होता त्यांना पुन्हा पाहिल्यास मी ओळखेन. त्या जाडया साहेबांनी मला तु दिनेश जैन यांना ओळखतो का? याबाबत माझेकडे विचारणा केली असता, मी त्यांना दिनेश जैन यांचा भंगाराचा व्यवसाय असुन मी त्यांना ओळखत असल्याचे सांगितले भोसले साहेब यांनी मला दिनेश जैन यांच्याकडुन चार वर्षापुर्वी ९ तोळे सोने विकत घेतल्याबाबत विचारणा केली असता मी, त्यांना एवढे सोने मी घेतले नसुन अंदाजे १७ ते १८ ग्रॅम सोने घेतल्याचे मला आठवत असल्याचे मी त्यांना सांगितले. त्यावेळी भोसले साहेब यांनी मला चोरीचे ९ तोळे सोने घेतल्याचा खोटा आळ लावून व मला केस करून अटक करण्याची धमकी देवुन माझेकडुन रक्कम रू. १,५०,०००/– ची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना माझेवर पोलीस केस न करण्याकरीता रू. ५०,०००/– देतो असे सांगितले असता त्या जाडया साहेबांनी माझेंकडे रू.७५,०००/– ची लाचेची मागणी केली. त्यानंतर मी माझे मोबाईल क्र. ९८६९९८२३०४ वरून माझा मेव्हणा गणपतसिंग दसाणा यांचे मोबाईल क्र. ८३६९३१७११० वर फोन केला व कांदिवली पोलीस ठाणे येथे रू. ४०,०००/– तात्काळ घेवुन येण्यास सांगितले. माझा मेव्हणा याने माझे दुकानात काम करणारा माझा पुतण्या राकेश तडेचा यांस कांदिवली पोलीस ठाणे येथे रू.४०,०००/– घेवुन पाठविले. राकेश कांदिवली पोलीस ठाणे येथे ४०,०००/– रूपये घेवुन आल्यानंतर मी सदरची रक्कम त्याच्याकडून घेतली व सदर पैसे मागणाऱ्या साहेबाच्या ताब्यात दिली. त्यावेळी त्या साहेबांनी उर्वरीत रक्कम रू. ३५,०००/– दुसऱ्या दिवशी दि. १०/११/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता घेवुन येण्यास सांगितले.

सदर लोकसेवक यांना लाचेची रक्कम देण्याची माझी इच्छा नसल्याने मी, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी मुंबई येथे दिनांक १०/११/२०२१ रोजी संध्याकाळी समक्ष हजर राहून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी मुंबई कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी यांना भेटलो. वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे स.पो.आ. पोवार यांनी कांदिवली पोलीस ठाणे येथील वरील वर्णनाचे लोकसेवक हे लाचेची मागणी करीत असल्याबाबत माझा लेखी तक्रार अर्ज स्वहस्तक्षरात लिहून घेतला व त्यावर माझी सही घेतली. सदर वेळी स.पो.आ जॉन व दोन पंच ला.प्र.वि. मुंबई कार्यालयात हजर होते. त्यानंतर स.पो.आ. पोवार यांनी दोन शासकीय पंचांशी व सपोआ जॉन यांचेशी माझी ओळख करून दिली. त्यानंतर स.पो.आ. पोवार यांनी पंचांना थोडक्यात हकिकत सांगून मी केलेला तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. स.पो.आ. पोवार यांचे सुचनेवरून सदरच्या

तक्रार अर्जावर दोन शासकीय पंचांनी स्वाक्षरी करून स.पो.आ. पोवार यांनी स्वत: स्वाक्षरी करून तक्रार अर्ज स्वत:चे ताब्यात ठेवला.

कांदिवली पोलीस ठाणे येथील वर नमुद लोकसेवक यांनी मला दि. १०/११/२०२१ रोजी माझेकडून उर्वरीत रक्कम रू. ३५,०००/— घेवुन कांदिवली पोलीस ठाणे येथे बोलाविले असल्याचे मी ला.प्र.वि कार्यालयातील सपोआ अविनाश पोवार यांना सांगितले असता त्यांनी माझे तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगितले. पडताळणी दरम्यान माझे शर्टाच्या आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावण्यात येणार असुन होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे मला सांगितले.

स.पो.आ. पोवार यांनी माझी पडताळणी पथकाची ओळख करून देवुन ला.प्र.वि. कार्यालयातून पोलीस पथकासह निघुन कांदिवली पश्चिम, एम.जी.रोड. येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेचे सरदार वल्लभभाई पटेल, जलतरण तलाव येथील आवारात शासकीय वाहनासह थांबलो. त्यानंतर मला स.पो.आ. पोवार यांनी कांदिवली पोलीस ठाणे येथील लोकसेवक भोसले यांचे कार्यालयात पडताळणीकरीता डिजीटल रेकॉर्डर चालू करून शर्टाचे आतील बनियनला लावून पंच श्री. मुणगेकर यांचे सह रिक्षाने पाठविले असता सदर लोकसेवक हे कार्यालयात उपस्थित नसल्याने मी पुन्हा पोलीस वाहनाजवळ आलो त्यानंतर सपोआ पोवार यांनी माझे शर्टाच्या आतील बनियानला लावलेला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढुन बंद केला. मी स.पो.आ.पोवार यांना हकीकत सांगितली असता त्यांनी पडताळणी कारवाई तात्पुरती स्थगित करून मला दि. ११/११/२०२१रोजी सकाळी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी मुंबई कार्यालयात हजर राहण्यास सांगितले.

स.पो.आ पोवार यांनी सांगितल्याप्रमाणे मी दि. ११/११/२०२१ रोजी लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथील कार्यालायात सकाळी १०.३० वाजता हजर झालो. सदरवेळी स.पो.आ जॉन व दोन पंच ला.प्र.वि. कार्यालयात हजर होते. स.पो.आ पोवार यांनी वर नमुद लोकसेवक यांच्या कार्यालयाच्या ठिकाणी पुन्हा पडताळणी करण्यात येणार असल्याचे मला सांगितले. सपोआ पोवार यांनी माझेकडे लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता मी त्यांना माझेकडे बचतीमधील रू. २०,०००/— असल्याचे सांगितले. त्यानंतर सपोआ पोवार यांनी आज रोजी पुन्हा पडताळणी व सापळा कारवाई करावयाची आहे असे सांगितले. त्याप्रमाणे मला सापळा कारवाईच्यावेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर मला ब्युरो कार्यालयाचे गोपनिय कक्षात नेऊन माझे कडुन लाचेकरीता वापरण्यात येणारी रक्कम रू. २०,०००/— ताब्यात घेतल्या. त्यानंतर नमुद नोटांचे क्रमांक नोंद करून त्या नोटांच्या छायांकित प्रती लाप्रवि कार्यालयाच्या झेरॉक्स मशिनवर काढुन घेतल्या. त्यानंतर ला.प्र.वि.कार्यालयातून पोलीस पथकासह निघुन जलतरण तलाव, कांदिवली पश्चिम येथील शासकीय वाहनासह थांबलो. त्यानंतर स.पो.आ. पोवार यांनी मला कांदिवली पोलीस ठाणे येथील वर नमुद लोकसेवक यांचे कार्यालयात पडताळणीकरीता डिजीटल रेकॉर्डर चालू करून शर्टाचे आतील बनियनला लावून पंच श्री. मुणगेकर यांचे सह पाठविले असता वर नमुद वर्णनाचे लोकसेवक हे कार्यालयात उपस्थित होते. त्यांनी माझे सोबत असलेले पंच श्री. मुणगेकर यांना कार्यालयातून बाहेर काढले. त्यानंतर माझेमध्ये व वर नमुद लोकसेवकामध्ये कामसंदर्भात चर्चा झाली त्यावेळी त्या लोकसेवकाने लाचेची मागणी केली होती त्यांचे नाव भोसले साहेब असुन दुसऱ्या साहेबांचे नाव पवार साहेब असल्याचे मला समजले. परंतु लाचेच्या रक्कमेचा उल्लेख झाला नसल्याने दि. १२/११/२०२१ रोजी पुन्हा पडताळणी करण्यात येणार असल्याचे मला स.पो.आ. पोवार यांनी सांगितले. तसेच माझेकडुन घेण्यात आलेली लाचेची रक्कम परत माझे ताब्यात देवून सदरची रक्कम खर्च न करण्याबाबत सांगितल्याने सदरची रक्कम ही मी माझे दुकानात ठेवुन दिली व त्याबाबत माहिती माझा पुतण्या राकेश यास दिली.

समक्ष,

( अविनाश पोवार ),
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

स.पो.आ पोवार यांनी सांगितल्याप्रमाणे मी दि. १२/११/२०२१ रोजी १०.०० वाजता जलतरण तलाव, कांदिवली पश्चिम येथे आलो असता तेथे लाचलूचपत प्रतिबंधक विभागातील श्री. पोवार व श्री. जॉन व पथक येथे हजर होते. मला स.पो.आ. पोवार यांनी कांदिवली पोलीस ठाणे

येथील लोकसेवक भोसले यांचे कार्यालयात पडताळणीकरीता डिजीटल रेकॉर्डर चालू करून शर्टाचे आतील बनियनला लावून पंच श्री. मुणगेकर यांचे सह रिक्षाने पाठविले. भोसले साहेब व पवार साहेब हे कांदिवली पोलीस ठाणे येथे हजर नसल्यामुळे मी व पंच मुणगेकर रिक्षाने बृहन्मुंबई महानगरपालिकेचे सरदार वल्लभभाई पटेल, जलतरण तलाव येथे उभ्या असलेल्या पोलीस वाहनाकडे परत आलो. त्यानंतर सपोआ पोवार यांनी माझे शर्टाच्या आतील बनियानला लावलेला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढुन बंद केला.

मी पोलीस वाहना जवळ थांबलो असताना मला साधारण १२.३० वाजताच्या सुमारास माझा पुतण्या श्री. राकेश तडेचा यांचा माझे मोबाईलवर फोन आला व त्याने मला माझे दुकानात मोटर सायकलवरून आलेले साध्या वेशातील पोलीसांनी त्यास रिक्षात बसवुन कांदिवली पोलीस ठाणे येथे घेवुन जात असल्याचे मला सांगितले. सदरबाबतची हकीकत मी सपोआ पोवार साहेब यांना सांगितली असता त्यांनी मला पुन्हा पडताळणी करीता लोकसेवक यांचे कार्यालयात पाठविण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यान घ्यावयाच्या खबरदारीबाबत सुचना दिल्या आणि माझे शर्टाच्या आतिल बाजुस बनियनवर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावला. दिनांक ११/११/२०२१ रोजीच्या पडताळणी दरम्यान पंच मुणगेकर यांना लोकसेवक भोसले यांनी दम देवून त्यांचे कार्यालयात न येण्याबाबत सांगितले होते. त्यामुळे कांदिवली पोलीस ठाणे येथे गेल्यावर पंच श्री. मुणगेकर यांनी पोलीस ठाणच्या आवारातील कॅन्टीनजवळ थांबावे असे मी त्यांना सांगितले. त्यानंतर मी कांदिवली पोलीस ठाणेच्या पहिल्या मजल्यावरील गुन्हे प्रकटीकरण कक्षात गेलो परंतु तेथे भोसले साहेब नसल्याने त्यांना मी पोलीस ठाणेचे पहिल्या मजल्यावर शोधून मी पोलीस ठाणेच्या इमारतीचे खाली येवून भोसले साहेबांना शोधत असताना माझा पुतण्याचा पुन्हा फोन आला व मला कोठे आहे असे विचारले असता मी त्यास कांदिवली पोलीस ठाणेचे गेट जवळ असल्याचे सांगितले. थोड्यावेळातच भोसले साहेब, पवार साहेब व माझा पुतण्या कांदिवली पोलीस ठाण्यात आले. तेव्हा भोसले साहेब, मी, व माझा पुतण्या असे पोलीस ठाणेचे मागे असलेल्या चहाचे टपरीवर बसलो. तेथे भोसले साहेब माझेशी इतर विषयावर बोलून झाल्यानंतर त्यांचे मला पैशाचे काय केले, असे विचारले असता मी भोसले साहेबांना पैसे सोबत आणले नसल्याचे सांगितले तेव्हा भोसले साहेबांनी मला तेथेच थांबवून मला पुतण्यास रू. ३५०००/– आणण्यास सांगितल्याने मी पुतण्यास सांगितले की, '' स्टेट बँके मेसे और अपने दुकान मे रखा हुआ रू.२०,०००/–, वह लेके आओ । '' माझा पुतण्या पैसे आणण्याकरीता पंच श्री. मुणगेकर यांचे सोबत निघून गेला. त्यादरम्यान मी भोसले साहेब व पवार साहेबांना " थोडा एक ५,०००/– रूपये कम कर दो " अशी विनंती केली असता भोसले साहेबांनी " हा करो " असे म्हटले व पवार साहेबांनी " दस कर दो " असे मला सांगितले.

काहि वेंळानंतर मी व भोसले साहेब चहाचे टपरीवर बसलो असताना पुतण्याने त्याचे सोबत आणलेली रोख रक्कम रू. ३५,०००/– माझेकडे दिली. त्यावेळी पंच श्री. मुणगेकर हे थोड्या अंतरावर उभे होते. मी भोसले साहेबांना रू. ३५,०००/– दिल्यानंतर भोसले साहेबांनी ती ताब्यात घेवून टपरीच्या समोरील एका कोपऱ्यात जावून मोजू लागले. मी माझे पुतण्यासह बोलत असताना श्री. पवार साहेब हे देखिल तेथे आले व ते माझे सोबत बोलू लागले तेव्हा पंच श्री. मुणगेकर हे देखिल थोड्या अंतरावर उभे होते. काही वेळातच भोसले साहेब हातात पैसे घेवून पुन्हा माझे जवळ आले व पैशांना पावडर असल्याचे सांगून पैसे पुतण्याचे ताब्यात दिले. त्यानंतर पुतण्याने सदरची रक्कम माझे ताब्यात दिली. भोसले साहेबांनी मला '' मेरे साथ चलो'' असे म्हणून त्यांचे मोटार सायकल जवळ नेले तेथे पवार साहेब देखील उपस्थित होते. भोसले साहेबांनी स्वतःची मोटार सायकल सुरू केली व मला जवळ बोलावुन माझेकडून पैसे मागुन घेतले, तेव्हा मी पुन्हा भोसले

सांहेबाना पैसे दिले असता भोसले साहेब सदरचे पैसे घेवून सुसाट मोटार सायकलवरून निघून गेले. तेव्हा पोलीस देखिल त्यांचे मागे धावत निघून गेले.

नंतर सर्व पोलीस पोलीस ठाणेत आले. काही वेळाने सपोआ पोवार साहेबांनी मला व पुतण्याला पहिल्या मजल्यावरील डिटेक्शन रूम अधिकारी कक्षामध्ये बोलविले. तेथे सपोआ पोवार साहेबांनी एका माणसाकडे बोट दाखवून हेच भोसले साहेब आहेत का? असे विचारले असता मी सपोआ पोवार साहेबांना हेच भोसले साहेब असल्याचे सांगितले व त्यांनीच माझेकडून रू. ३५,०००/— लाचेची रक्कम घेतली असल्याचे मला सांगितले.

श्री. पवार साहेब व श्री. भोसले साहेब यांनी माझेवर, मी चोरीचे ९ तोळे सोने घेतल्याचा खोटा आळ लावून व मला केस करून अटक करण्याची धमकी देवुन माझेकडुन रक्कम रू.१,५०,०००/— ची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना घाबरून माझेवर केस न करण्याकरीता रू.५०,०००/— देतो असे सांगितले असता भोसले साहेब यांनी तडजोडी अंति माझेंकडे रू.७५,०००/— ची लाचेची मागणी केली. त्यापैकी दि.०९/११/२०२१ रोजी रू. ४०,०००/— लाच स्विकारून आज रोजी श्री. पवार साहेब व श्री. भोसले साहेब यांनी माझेकडे उर्वरीत रू. ३५,०००/— रूपये लाचेची मागणी करून ती श्री. भोसले साहेब यांनी माझेकडून स्विकारून मोटार सायकलवरून पळून गेले म्हणून माझी त्याचेविरूध्द कायदेशीर तक्रार आहे. माझे लोकसेवक श्री. अविनाश पवार व श्री. रविंद्र भोसले यांचेशी कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार नाही.

माझी वरील फिर्याद मी हिंदीत सांगितली असुन ती मराठीत अनुवादीत करून मला वाचुन समजावुन सांगुन माझे सांगण्याप्रमाणे लॅपटॉपवर टंकलिखीत केली असून त्याची प्रिंटरद्वारे प्रिंट काढुन ती मला वाचण्यास दिली असता ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

( अविनाश पोवार ),
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ तात्काळ

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ........

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ........

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे

First Information brief contents (Attach separate sheet, if required) Detail write down back blank page

यातील फिर्यादी यांचे परिचयाचे कारागीराने त्यांना कांदिवली पो. ठाणेच्या गुन्ह्यातील ८ तोळे सोने विकले होते. आरोपी क्र. १ रविंद्र भोसले व आरोपी क्र. २ अविनाश पवार यांनी फिर्यादी यांचेविरुध्द गुन्हा नोंद करु नये म्हणून फिर्यादी यांचेकडून रु. ७५०००/- ची मागणी केली होती. त्यापैकी दि:- ०८/११/२१ रोजी आरोपी क्र. १ यांनी रु. ४०,०००/- स्विकारले व उर्वरीत रक्कम रु. ३५०००/- देण्याकरीता फिर्यादी यांचेकडे तगादा लावला. दि: १२/११/२०२१ रोजीच्या पडताळणीमध्ये आरोपी क्र. १ व २ यांनी फिर्यादी यांचेकडे उर्वरीत रकमेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने सापळा कारवाई दरम्यान आरोपी क्र. १ याने फि. यांचेकडून लाचेची रक्कम रु. ३५०००/- स्विकारुन पो. ठाणे आवारातील त्यांचे मो/सा वरुन पळून गेले व लाचेच्या रकमांच्या नोटांची अदलाबदली करुन पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला म्हणून भ्र.प्र. अधि. १९८८ कलम ७ सह भादंवि कलम २०१ अन्वये गुन्हा नोंद.

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : ........

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........, जिल्हा ........, राज्य

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) ........ Rank ........ No ........ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ........ (3) Transferred to P.S. ........

District ........ on point of jurisdiction

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

मो. मोहन शिंगाडे

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name अविनाश पोवार

पदनाम Rank सहाय्यक पोलीस आयुक्त,

तपासिक अ. चा कोड क्र. ला.प्र.वि. मुंबई.

Posting

Code No. of I.O. ........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ........

1. Date and time of submitted to the Court

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अमलदार, 5. स्थळ प्रत

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy

Attachment to item 7 of **First Information Report**